# राशिभविष्य - मे, २०१६.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. या महिन्याच्या काळात याराशीच्या मंडळीना शारीरिक-मानसिक आरोग्याची काळजी त्रस्त करील. मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता दिसते. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. काही मंडळीना वाईट प्रसंगाला तर काहीना जिवावरच्या प्रसंगाला सामोरे जावे लागेल. काहीना अकारण शत्रुत्वाला तर काहीनाबेअब्रूच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. त्यातच आर्थिक चिंता त्रस्त करतील. आर्थिक फसवणूक होणेही संभवते. त्यातच गैरसमजाने आप्तेष्टात वाद, भांडणे होणे संभवते. शिवाय शारीरिक अनारोग्याची समस्याही काही मंडळीना त्रस्त करील. अशा परिस्थितीत रक्तदाब हृदयविकार असणारांनी तर मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. काही मंडळीना नेत्रविकाराचा तर काहीना मूळव्याधीचाआजार त्रस्त करील. काहीना अन्य उष्णताविकार त्रस्त करतील. जपा. हाडमोड होणेही शक्य आहे. त्याशिवाय वीज, पाणी यांपासूनही जपावे कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कमिशन, दलालीवर व्यवसाय असणाराना काळ लाभदायक होईल. राहूमुळे अपेक्षित संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. श्रद्धा असेल तर श्रीगणेशउपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना - विशेष करून युवकांना - हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो मोह टाळावाच. शिवाय आहे त्या नोकरीत मनापासून काम करावे. नपेक्षा अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता दिसते. जपा. नोकरी कोणत्याही प्रकारची असो, मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मन शांत व स्थिर ठेवून व सहनशील बनूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे इष्ट होईल. असे आचरण कराल तरच मित्रांशी भांडणे होणे टळू शकेल. केवळ मानसिक रोग तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काळ अनुकुल व प्र गतिकारक

होण्याची शक्यता दिसते. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना, आर्थिक चिंता, वाढता खर्च अशापैकी कारणानी काही मंडळीना गहरे नैराश्य येणे संभवते. त्यात भर म्हणून काही मंडळीना नातेवाईक मंडळीकडून होणारा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे कौटुंबिक सुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा. दांपत्यजीवनात स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे मानसिक ताण सहन करावा लागणे संभवते. काहीना तर कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. अशा परिस्थितीतही या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होण्याची शक्यता दिसते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. श्रद्धा असेल तर मन:शक्तीसाठी कुलदैवताची व श्री हनुमानाची उपासना करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून चिकित्सक बौद्धिक, शैक्षणिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळीनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साधावयाचे ते साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. कारण महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असल्यामुळे यश येण्याची शक्यता अल्प आहे. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती, अपयश, वाढता खर्च , मानसिक चिंता अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. " वरून कीर्तन , आतून तमाशा" अशा प्रकारचे ढोंगी आचरण करू नका. नुकसान होईल. मनापासून अध्यात्माची ओढ असेल तर श्रद्धेने आध्यात्मिक उपासनेत मग्न राहा. आध्यात्मिक प्रगतीस काळ अनुकूल होईल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील. काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. आरोग्यस्थानी वक्री शनि-मंगळ असल्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना उष्णताविकारांचा तर काहीना वातविकारांचा त्रास होणे संभवते. तसेच काही मंडळीना रक्तविकार, हृदयविकार अशा प्रकारच्या अनारोग्याचा त्रा स सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरू-राहू मुळे भावंड सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लेखक-लेखिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. मुत्सद्दी , राजकारणी मंडळीना त्यांच्या कार्यक्षेत्रात यश लाभेल. काहीना बढती मिळणेही शक्य आहे. श्रद्धेने गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे नियमितपणे पठण करा.

(४) कर्क - या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. काहींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होणे संभवते. नोकरदारांपैकी काहीना उच्च पद मिळणेही शक्य आहे. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीयसंशोधन कार्यक्षेत्र असणारांना यशदायक परिस्थिती असल्याचा अनुभव येईल. काहीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशवारीचे योग येतील. पण शुक्र ग्रह अस्तंगत असल्यामुळे कलात्मक विषय संबंधी नोकरी असल्यास मात्र या महिन्याचा काळ तितकासा अनुकुल होणे संभवत नाही. उलट अडचणी, अडथळे येणेच शक्य दिसते. तसेच कौटुंबिक जीवनातही वाद, गैरसमज यांमुळे सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. त्यात भर म्हणून काहीना आर्थिक समस्या त्रस्त करतील. पण गुरु ग्रह अनुकुल असल्याने काही सुखकारक घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या वक्री शनि-मंगळ या ग्रहांमुळे संततिसमस्या मनस्ताप देण्याची दाट शक्यता आहे. केतुमुळे अनारोग्य, त्वचाविकार, रक्तविकार, मुख-दंत रोग अशापैकी आजार होणे संभावते. जपा. तसेच विषबाधा होणे, पाण्यापासून धोका होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांतीदेऊ शकेल.

(५) सिंह - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरदार मंडळीना नोकरीचे ठिकाणी मानहानी, मानसिक ताण, विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. सर्व काही मनासारखे घडेल. विशेष करून चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. इतर नोकरदार मंडळीनाही काही ना काही इच्छा पूर्ण करणारे मिळू शकेल. पण कौटुंबिक सुख व वैवाहिक जीवनातील सुख या बाबतीत मात्र या राशीच्या मंडळीनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करावे व विपरीत काळ व्यतीत करावा. कारण सतत मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडण्याची शक्यता दिसते. कौटुंबिक भांडण तंटे, गैरसमज, असमाधानकारक घटना, जन्मदात्या मातेशी न पटणे अशा घटनांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील, तर काहीना स्थावर संबंधी समस्या

त्रस्त कारीलसे दिसते. वैवाहिक जीवनातही जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील मतभेद अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. जपा. विचाराच्या तंद्रीत रस्त्यातून चालू नका. तसेच मोबाईलवर बोलत गाडी चालवू नका. अपघात भय आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. तसेच या काळात परीक्षेचा निकाल लागणार असेल तर अपेक्षा पूर्ण करणारे यश लाभेल. श्रद्धा असलेल्या दैवताच्या नावाचा सतत जप करा. मौन पाळा म्हणजे मन:शांती लाभेल.

**(६) कन्या** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात काल्पनिक चिंता मनस्ताप देतील. तसेच काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. केवळ बौद्धिक, शैक्षणिक , समाजसेवा असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व सुखकारक होईल. या राशीच्य ाव्ययस्थानी असलेल्या राहूमुळे शत्रूपासून रक्षण होईल. शक्यतो प्रवास करू नका. अडचणी, अडथळे येण्याची शक्यता दिसते. अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. मात्र कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी वक्री शनि-मंगळ असल्याने युतीत असल्याने भाजणे, कापणे, इजा होणे अशा गोष्टी घडण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच काहीना भावंड विषयक चिंता त्रस्त करील. या राशीच्या युवक-युवतीना नवे कार्यक्षेत्र वा नवी उत्तम नोकरी मिळू शकेल. जीवनसाथीचे विक्षिप्त , लहरी आचरण, दोघांतील मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज अशा कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही य ाचीकाळजी घ्यावी. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल.

**(७) तुळा** - या राशीच्या मंडळ ीनाअद्याप काही महिन्यांचा काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा त्रास सहन करावा लागणार आहे. तेव्हा मन व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवा व सहनशील बनून प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. सतत नम्रतेने वागा. त्यामुळे सर्व सुखाचेच होईल. फारसा मनस्ताप सहन करावा लागणार नाही. या मह िन्याच्या काळात आर्थिक चिंता त्रस्त करतील. येणे येण्यास विलंब होईल; पण देणे मात्र

वेळेवर द्यावेच लागेल. मनस्तापामुळे शारीरिक अनारोग्य होण्याची दाट शक्यता दिसते. काही मंडळीना उष्णता विकारांचा त्रास सहन करावा लागेल डोळे, घसा, मान, दाढा दुखणे संभवते. काहीना मुदतीचा ताप, डोकेदुखी, मेंदूविकार, डोळ्याचे दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या मंडळीचे स्वत:चे अनारोग्य, जीवनसाथीचे अनारोग, मुलांपैकी कोणाचे अनारोग्य यामुळे थकवा येईल. काहीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशयविकाराचा आजार सहन करावा लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता आहे. केवळ शैक्षणिक , चिकित्सक बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांनच काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना बढती, अधिकारपद असे काही मिळणे शक्य दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात विविध कारणानी अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून शुभ घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा.

**(८) वृश्चिक** - शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून सतत नम्रतेचे आचरण करा. अहंकार, मानापमान, हेकट स्वभाव बाजूला ठेवून समजूतदारपणे आचरण करा. नपेक्षा विचित्र परिस्थिती निर्माण होईल. कौटुंबिक सुखसमाधानातबाधा निर्माण होईल. जपा. या राशीच्या काही मंडळीना जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. काही मंडळीच्या कौटुंबिक जीवनातीलप्रिय जन स्थलांतरीत होणे संभवते. त्यामुळे बेचैनी वाढेल. अशा परिस्थितीत कुसंगतीची बाधा होण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेणयाचा प्रयत्न करावा. शैक्षणिक , बौद्धिक कार्यक्षेत्र , वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीचा सन्मान होईल; तर काहीना अधिकार पद प्राप्त होणे शक्य आहे. कलात्मक व्यवसाय असणाऱ्या मंडळीच्या कलाविश्कारास अनुकुल व पोषक परिस्थिती निर्माण होईल. सर्व प्रकारच्या कलाकारांनी त्याचा लाभ घेण्याचा प्रयत्न करावा. गूढ संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना प्रगतीसाठी काळ अनुकुल होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मनस्थिती शांत राहावी यासाठी श्र द्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे

हनुमानचालिसा स्तोत्राचे  पठण करा.

**(९) धनु-** शनि ग्रहाच्या  साडेसातीचा काळ असल्याने या राशीच्या मंडळीनी सतत सावधानतेने आचरण करावे. तसेच मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला करावा. तरच आरोग्य फारसे बिघडणार नाही.  या राशीच्या व्ययस्थानी असलेले शनि-मंगळ वक्री असून असह्य मनस्ताप देणारे ग्रह आहेत. सतत गैरसमज, वाद, भांडणे, मानहानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे बेचैन व्हाल. त्यात भर म्हणून काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर तीही पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या राशीच्या पुरुषांना स्त्री -वर्गाकडून त्रास होणे संभवते. जपा. शनि ग्रह व्ययस्थानी आणि शत्रू राशीत मंगळासह असल्याने आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. आर्थिक नुकसान, फसवणूक होणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्य ाचा उत्तरार्धच  अनुकुल व सुखकारक होईल. हितशत्रूचे मनसुबे धुळीला मिळतील. विरोधकांवर मात करू शकाल. काही लाभदायक घटना घडण्याची शक्यत ाआहे. पण महिन्याच्या पूर्वार्धात मात्र घरीदारी मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडण्याची शक्यता आहे. जपा. पण गुरु ग्रहाची पूर्ण दृष्टी असल्याने सर्व काही सुसह्य असेच घडेल. अध्यात्माची मनापासून ओढ असेल तर उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. सद्गुणांचा विकास होईल. पण त ेथेचराहू असल्याने तो कौटुंबिक सुखात व संतती सुखात बाधा निर्माण करू शकेल. जपा. श्रद्धेने दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुलअसणार आहे. त्यामुळे शारीर िक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. नोकरीत वरिष्ठांची नाराजी सहन करावी लागेल. घरी संततीसमस्या त्रस्त करील. तसेच कौटुंबिक वाद, भांडणे होणेही संभवते. जपा. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील. महिन्याच्या उत्तरार्धात  नातेवाईक मंडळ ीशीदुरावा, फारकत होण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे असह्य दु:ख होऊन अस्वस्थ व्हाल. जपा. तसेच आर्थिक चिंताही त्रस्त करतील. पण बुध-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व

यशदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या धनस्थानी असलेले केतू-नेपच्यून आर्थिक चिंता, आर्थिक घोटाळे, आर्थिक जबाबदाऱ्या वगैरे समस्या कशा सोडवायच्या अशापैकी विचारांनी मेंदूला ताण पावण्याची शक्यता जाणवते. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शनि-मंगळामुळे कष्ट-परिश्रमानेच अर्थलाभ होणे संभवते. लाभस्थानी असलेल्या मंगळामुळे काहीना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणे संभवते; पण तेथील वक्री शनि ग्रह संततिविषयक समस्यांनी त्रस्त करील. या राशीच्या ज्या मंडळीच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहीना तसा धनलाभ होणे संभवते. काहीना वारसाहक्काने धनलाभ होणेही शक्य आहे. पण गुरु सह राहू असल्याने या राशीच्या ज्या मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असेल त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळाच. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा.

(११) कुंभ - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल झाले असल्याची शक्यता जाणवते. तसे असेल तर शीघ्र मानसिक संवेदना होत असतील व मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. काहीकरू नये असे वाटत असण्याची शक्यताही दिसते. पण वाचा स्थानातील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असणेही संभवते. कसलेही दडपण किंवा कोणी समजुतीच्या सांगितलेल्या चार गोष्टी सहन होत नसतील. अविचाराने खर्च होणे होत असेल. शिवाय संतापाच्या भरात आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमानही होत असेल. तसेच विक्षिप्तपणाचे आचरण होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुलव लाभदायक होईल. काहीना भूमिलाभ होणे संभवते तर काहीना मानाचे स्थान मिळण्याची शक्यता आहे. इतर काही मिळाले नाही तरी महिन्याचा पूर्वार्ध सुखानंदसंतोषत पार पडेल एवढे मात्र खरे. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. कौटुंबिक वातावरण विरोधी होईल व वाद, गैरसमज, वाढता खर्च , यांमुळे त्रस्त व्हाल व स्वत:चे आरोग्य बिघडेल जपा. ज्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे त्यांना हा काळ लाभदायक होईल. या राशीच्या युवकयुवतीचे विवाह ठरतील ; पण काही हितशत्रूच्या कारवायांमुळे त्यात बाधा येणे संभवते. जपा. तसेच दाम्पत्य जीवनातील सुखातही काही कारणांनी बाधायेने संभवते. जपा. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच औषधविक्रेत्यांना , लोखंड, कोळसा व्यापाऱ्याना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रीहनुमान उपासना करा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी हर्षल असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा, असे वाटते. कसलाही धाक, दडपण, समजुतीच्या सांगितलेल्या चार गोष्टी अपमानकारक वाटत असाव्यात, असे दिसते. विशेष करून या राशीची लहान मुले अत्यंत हूड, व्रात्य झाली असल्याचा अनुभव पालकांना येत असेल. पालकांनी त्यांच्यावर विशेष लक्ष द्यावे, असे सांगावेसेवाटते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या या राशीच्या मंडळीना त्यांच्या कार्यात उपयुक्त ठरणार आहे. या राशीच्या अन्य नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कर्तृत्वाचेकौतुक करतील. काहीना बढती, मानाचे स्थान, अधिकारपद असे काही मिळू शकेल. काहीच मिळाले नाही तरी महिन्याचा उत्तरार्ध सुखानंद संतोषाचा जाईल, एवढे मात्र खरे. या राशीच्या स्त्रीवर्गाला लागणाऱ्या वस्तूंचा व्यापार करत असणाऱ्या मंडळीना स्त्री - ग्राहकाकडूनच अधिक द्रव्यलाभ होईल. या राशीच्या बौद्ध्दिक व शैक्षणिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना मात्र संपूर्ण महिन्याचा अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्य- विशेष करून डोळ्याचे - आप्तेष्ट भांडणे , फसवणूक, आर्थिक चिंता अशापैकी घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " नियमितपणे पठण करा.

=====ooo0ooo=====